
जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in


६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया



❖ वर्ष ५० वे ❖अंक ४ था ❖ डिसेंबर २०१८ ❖ वीर संवत २५४५ ❖विक्रम संवत २०७५


या अंकात


| या अंकात | पान नं. |
|---|---|
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय ३१ : चरणविधी | १५ |
| ● वाचकांचे मनोगत..... जैन जागृति ५० वर्षात पदार्पण ! | १७ |
| ● कडवे प्रवचन | २० |
| ● मौत का अलार्म | २० |
| ● स्वयं को सहना सीखे | २१ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | २३ |
| ● कव्हर तपशील | २४ |
| ● बटवारा | ३१ |
| ● अ..........ज्ञ | ३२ |
| ● औरा री बढाई कर | ३३ |
| ● विराट वागरणा | ३६ |
| ● हमारे जीवन का लक्ष्य क्या है | ४४ |
| ● चलती रहें जिंदगी – मेरे घर आयी एक नन्ही परी | ५१ |
| ● आर्ट ऑफ हैप्पी लाइफ | ६१ |
| ● सुखी जीवन की चाबियाँ – इन्द्रिय जय | ७५ |
| ● हास्य जागृति | ८१ |
| ● डायमंड डायरी | ८३ |
| ● मेरी उलझन | ८६ |
| ● सुखी, समाधानी, आनंदी रहाणं सोपं आहे | ८७ |
| ● एक छोटी सी बात | ८८ |
| ● वचनों को संभालो | ८९ |
| ● सौ. मनीषा चोरबेले, पुणे | ९५ |
| ● श्री. सत्यसाधनाजी दीक्षा महोत्सव, पुणे | ९५ |
| ● आनंदऋषिजी नेत्रालय, अहमदनगर | ९७ |
| ● महर्षी आनंद पुरस्कार – मरकळ | ९८ |
| ● श्री. सुनीलजी सिंघी – सन्मान पुणे | ९९ |
| ● C.A. चिराग कटारिया, पुणे | १०१ |

● चि. कौशल टाटीया, पुणे – सन्मान १०१
● पावापुरी जलमंदिर, पुणे १०३
● परिक्षा पालकांची १०६
● शांति से क्या मिलेगा? १०९
● अर्हम दम्पत्ति पुस्तक प्रकाशन, चैन्नई ११५
● नाहर परिवार कुलदेवी प्राणप्रतिष्ठा, पुणे ११६
● चोरडिया महासंमेलन ११७
● प्रकृति : प्रसन्नता की सीख ११९
● आचार्य सम्राट श्री शिवमुनीजी म.सा. २०१९ पुणे चातुर्मास १२०
● धर्म और नैतिकता १२१
● जैन धर्म आणि समाज १२४
● मुझे कुछ कहना है १२६
● पसंद-नापसंद में से मुक्ति चाहिए १२८
● रत्नसंदेश १२९
● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या


**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर** ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI
Bank : STATE BANK OF INDIA
Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146
IFS Code : SBIN0006117


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२-१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**
**Email : jainjagruti1969@gmail.com • Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

- ❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९
- ❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
- ❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
- ❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
- ❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
- ❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
- ❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
- ❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
- ❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
- ❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
- ❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
- ❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
- ❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
- ❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
- ❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
- ❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७-२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
- ❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
- ❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
- ❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३-२३११००८,मो.९४२३९३९९९०
- ❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
- ❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
- ❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
- ❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
- ❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२-२२३८०७ मो.:९३२५००४९५०
- ❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
- ❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
- ❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
- ❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
- ❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
- ❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
- ❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१-२६९५४३३
- ❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

## तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.

भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे *(क्रमशः)*

## अध्याय – ३१
## चरणविधी

**''नाईलाजाचा एकच इलाज असतो कबूल करा, स्वीकार करा''**

चरण म्हणजे पाय–शरीराचे जसे दोन पाय असतात तसेच जीवनाचे सुद्धा दोन पाय असतात. एक श्रद्धेचा दूसरा संयमाचा. एक प्रवृत्तिचा दूसरा निवृत्तिचा. दोन्ही पाय एका बरोबर चालत नाहीत. एक पाऊल पुढे एक मागेच टाकावे लागते. एकाबरोबर नातं तोडा, एका बरोबर नातं जोडा एक पाऊल पुढे टाका. एक पाय मागे टिकवा. पापा बरोबर नाते तोडा. पुण्याबरोबर नातं जोडा, संयमात प्रवृत्ति करा असंयमातून  निवृत्त व्हा. आपल्या शरीरात शक्ती ही सक्रीय आहे, ती निष्क्रीय राहू शकत नाही. जो जिवंत आहे तो सक्रीय आहे. त्या ऊर्जेची फक्त दिशा बदलणे आपल्या हातात असते. ज्या शक्तीमुळे उपद्रव होत होता त्याच शक्तीचा उपयोग करून उपलब्धी प्राप्त करता येते.

लहान मुलांना रडवलंही जाऊ शकते, हसवलंही जाऊ शकते. झोपेतून उठवताना त्याला महाभारतातील कथा सांगून ही उठवलं जाऊ शकतं, तर भगवंत भक्तीगीताने हसवतही उठवलं जाऊ शकतं. मुलांच्या हातातील मोबाईल सोडवायचं असेल तर फक्त चीडून चालणार नाही, त्याची पर्यायी व्यवस्था त्याला दिली पाहिजे. वाईटाचा दरवाजा बंद करताना चांगल्याचा दरवाजा उघडला पाहिजे.

**जीवन सागर तारणहारी पंचसूत्री**

जसे तलावात येणाऱ्या घाण पाण्याच्या नाल्यांना बंदच करावे लागते तसे तलावात असणारी घाण, कचरा, गाळ हा काढावाही लागतो. मनुष्य, पशु मल–मुत्रादी करतात, कपडे धूतात त्यांना प्रतिबंध करून तलावाला स्वच्छ ठेवण्याची योजना करता येते. परंतु पक्षी वरून बीट करतात, मुल दगड फेकतात त्यांना प्रतिबंध करता येत नाही, त्यांना सहनच करावं लागतं. असचं काहीसं आपल्याही जीवनात करावं लागतं. त्यासाठी भगवंतांनी पाच सूत्रे दिली आहेत.

पाप जीवनात न येण्यासाठी पाच शब्द आहे. रूंभई, चयइ, सहइ, वज्जइ, जयइ हे पाच शब्द जीवन शैलीचे आहेत. काही गोष्टी अडवण्या सारख्या असतात, काही सोडण्यासारख्या असतात. सगळ्यांना अडविले जाऊ शकत नाही किंवा सगळ्या गोष्टींना सोडता पण येत नाही. त्या सहज स्वीकार कराव्या लागतात. **नाईलाजाचा एकच इलाज आहे कबूल करा, स्वीकार करा.**

काही गोष्टींचा त्याग केला पाहिजे. वर्ज करणे व सोडणे यात काही गोष्टींना सांभाळलं पाहिजे.

**१) रूंभइ –** थांबवणे. पाप–द्वेष, राग पाप कर्माच्या प्रवृत्तिला थांबविणे, आतून तिरस्कार आला तर त्याला तोंडावर तरी येऊ देऊ नका. क्रियेत – प्रतिक्रियेत ऊतरू देऊ नका.

**२) चयइ –** सोडणे. तीन गोष्टींचा त्याग करा. मनदंड, वचनदंड, कायादंड, **ज्याच्यामुळे आपल्या**

**मनाला त्रास होतो ते नाही करायचं. ज्याच्यामुळे आपल्या जीव्हेला पश्चाताप करावा लागेल ते नाही बोलायचे, ज्याच्यामुळे शरीराला त्रास सहन करावा लागेल ते नाही करायचे. यालाच 'दंड' म्हणतात.** अकरणीय करण, अभाष्य बोलणं, दुष्टचिंतन म्हणजेच स्वत:ला दंड देणे आपल्या संपत्तिचा गौरव (अभिमान) सुखाचा गर्व, आपल्याला जी स्वस्थता लाभली आहे त्याचा गर्व करू नका. आपल्या जवळ जे आहे त्याचा गर्व करू नका, अभिमान करू नका. तीन काटे आहेत- माया शल्य, निदान शल्य, मिथ्यादर्शन शल्य अशा गोष्टी आहेत ज्यांचा त्याग करणे अनिवार्य आहेत.

आपल्या स्वजनाशी, दोस्तांशी जर काही बनवा-बनवी, मस्करी केली असेल तर तो काटा आहे, तो काढून टाका. कधी कुणाबरोबर गैरसमज झाला तर ती व्यक्ती येऊन कितीही स्पष्टीकरण देऊ लागली तरी गैरसमज कमी होणार नाही. उलटा तो वाढत जाईल. पण तुम्हीच त्या व्यक्तीकडे जाऊन तुमच्या मनातला गैरसमज बोलून दाखविला, सत्य परिस्थिती जाणून घेतली तरच ते गैरसमजाचे जाळे दूर होईल. गैरसमजाचा काटा जीवनात ठेऊ नका व नियाणाचा काटा ही जीवनातून काढून टाका.

कोणते संकट, आपत्ती आली तर आपले त्याच्यावर नियंत्रण असू शकत नाही परंतु रागद्वेषावर आपण नियंत्रण करू शकतो. गर्व करण्याचे सोडू शकतो.

**३) सहइ –** ज्या गोष्टी आपल्या स्वाधीन नाहीत जसे लाईट गेली आपण काय करू शकतो ? ज्याचा उपाय आपल्या हाती नाही त्याला स्वीकार करा. घरात शांती हवी असते, घरात खूप गोंधळ चाललाय. तुम्ही सांगीतलं ''शांती ठेवा, सगळे शांत बसा'' परंतु तसे होत नाही मग त्या कोलहलाचा संगीताप्रमाणे आनंद घ्या. ही सगळ्यात चांगली पद्धत आहे. रस्त्यावर ट्रॅफीक जाम मधे अडकलात, पर्याय नाही स्वीकार करा. खूप सरळ आहे.

**जे आपण टाळू शकत नाही त्यात रममाण व्हा, त्याचा व्यत्यय मानू नका आनंद घ्या.** सूत्र आहे कोणी तुम्हाला चिडवीत आहे तुम्ही मजा घ्या, चिडचिड केली तर फायदा नाही. मजा घेतली तर त्याचं चिडवणं टिकणार नाही याला म्हणतात सहइ.

**४) वज्जइ –** काही गोष्टींचा प्रतिबंध उपाय करावा लागतो. लांबूनच काही गोष्टींना हात जोडावे लागतात त्याला वर्जन म्हणतात. काय-काय वर्जन करायचं ? विकथा सोडावी लागतात त्यालाच वर्जन म्हणतात. विकथा म्हणजे ज्यामूळे आपल्या मनात विकार, उत्तेजना व भय उत्पन्न होईल अशी कथा ऐकण्यापेक्षा एकटे राहिलेलं बरं. ज्यामुळे कषाय जागृत होईल - आहाराची उत्तेजना जागृत होईल, भयाचा उद्वेग होईल, विकारांचे वादळ उठेल, मनात लालसा जन्म होईल अशा साऱ्या गोष्टींना दुरूनच हात जोडावे.

**५) जयई –** जो वसा घेतला आहे, जो नियम घेतला आहे त्याला निभावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सम्यक प्रकारे चालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जे कार्य करण्यायोग्य आहे ते करायचा प्रयत्न केला पाहिजे.

हे ५ पाच सूत्र रूंभइ, चयइ, सहइ, वज्जइ, जयइ आचरणात आणाल तर संसारात रहाल परंतु संसाराच्या दु:ख चक्रातून बाहेर पडाल.

या सर्व गोष्टींचे तंतोतंत पालन करणारा, जीवनात दु:खी-निराश होत नाही. संसाराचे रडगाणे न गाता सहज तो यातून बाहेर निघून मुक्त गगनाचा आनंद घेऊ शकतो तो आनंद आपणा सर्वांस प्राप्त व्हावा ही मनोकामना.●


***श्री गौतम लब्धि (निधि) कलश***

प्रेरणा : उपाध्याय **प. पू. श्री. प्रवीणऋषिजी म.सा.**

गौतम निधि मार्फत गरजू साधार्मिक बांधवाना शैक्षणिक, वैद्यकीय सेवा व विकास कार्यासाठी मदत केली जाते.

**संपर्क : गौतम लब्धि फाऊंडेशन, पुणे**

मोबा.: ९८२२२८८५३८, ९८२२०७८६५७

## ।। वाचकांचे मनोगत ।।
## जैन जागृति ५० व्या वर्षात पदार्पण...




### उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा. जैन जागृति पत्रिका को आशीर्वाद



श्री. संजयजी चोरडिया
सौ. सुनंदा चोरडिया

सादर धर्म संदेश !

यह जानकर हार्दिक प्रसन्नता हुई कि स्व. श्री. कांतीलालजी सा चोरडिया द्वारा स्थापित 'जैन जागृति' पत्रिका अपने ५० वर्ष पूरे करने जा रही है । पत्रिका द्वारा महाराष्ट्र एवं संपूर्ण जैन समाज में रचनात्मक कार्यों का संदेश देते हुए धर्म एवं संस्कारों के बीजारोपण हेतु एक सेतु का कार्य किया है जिससे समाज में एक नव चेतना का संचार हुआ है। ५० वर्षों से निरंतर-निर्बाध रुप से पत्रिका का संचालन एवं प्रकाशन समाज को प्रबोधन देते हुए स्व. श्री. कांतीलालजी सा एवम् चोरडिया परिवार की समाज को यह एक महत्वपूर्ण देन एवं उपलब्धि है । उनका गहन अनुभव, चिंतन तथा वास्तविकता के साथ तथ्यों की गुणवत्ता से परिपूर्ण यह पत्रिका सम्पूर्ण जैन समाज को गौरवान्वित कर रही है ।

मुझे ज्ञात है कि जब महाराष्ट्र में कोई जैन पत्रिका का प्रकाशन नहीं होता था ऐसे समय जब संसाधनों की भी कमी हुआ करती थी उस समय लगाए गए इस छोटे पौधे ने आज ५० वर्षों में विशाल वटवृक्ष का रुप धारण कर लिया है । वर्तमान में महाराष्ट्र जैन समाज में शायद ही ऐसा कोई परिवार हो जहाँ जैन जागृति नहीं जाती हो, यह कहने में कोई अतिशयोक्ति नहीं होगी कि जैन जागृति के बिना हर जैन परिवार अधूरा सा है। लोगों को बडी उत्सुकता से इस पत्रिका का इंतजार रहता है ।

निरंतर ५० वर्षों से प्रकाशित जैन जागृति ने सम्प्रदाय से परे संगठनात्मक स्वरुप का संदेश देते हुए जैन धर्म के संदेशों को जन-जन तक प्रचारित करने का कार्य किया है । मैं आपके इन कार्यों की प्रशंसा एवं अनुमोदना करता हूँ । साथ ही आशा करता हूँ कि जैन जागृति जन-जन की जागृति बने, जिनशासन की प्रभावना में अभिवृध्दि करे । आप निरंतर भविष्य में भी नए आयाम स्थापित करते जाए तथा जन-जन में धर्म चेतना और सुसंस्कारों की जागृति लाने में उपयोगी सिध्द हो । यही हार्दिक मंगल कामना....

उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी, चेन्नई

### उपप्रवर्तिनी महाराष्ट्र सौरभ सत्य साधनाजी म. सा. जैन जागृति पत्रिका को आशीर्वाद



जैन जागृति पत्रिका ५० वे वर्ष में प्रवेश करने जा रही है । इसकी हमें काफी प्रसन्नता है कि एक ही पत्रिका में All in one जैसे सारी चीजे उपलब्ध होती है । सभी साधु-साध्वी के अमूल्य वचन इस पुस्तक में आते है जिससे हमारे बालक, युवा, वृध्द को काफी सुंदर विचार पढने को मिलते है जिससे वह अपने जीवन की चर्या, संस्कारों की अभिवृध्दि कर

सकते हैं । तीर्थंकर गणधर की जानकारी भी अप्रतिम हैं । जिससे ज्ञान में अभिवृध्दि होती हैं ।

आज से ४९ वर्ष पूर्व श्री. कांतीलालजी चोरडिया ने अति सुंदर प्रयास किया । जिसका फल हर घर में जैन जागृति पहुँची । ऐसी ही आगे अभिवृध्दि हो । हमारी हार्दिक शुभकामना, मंगल भावना । इसका यश चारों ओर फैले । यह शुभभावना !

सत्यसाधनाजी म.सा.

यश लॉन्स, बिबवेवाडी, पूना चातुर्मास

## जैन समाजाचा आरसा

जैन जागृति मासिक मी लहानपणापासूनच वाचत आले आहे. नेहमीच आम्ही सर्वजण दर महिन्याला अंकाची उत्सुकतेने वाट पाहत  असतो.

जैन जागृति मासिक स्व.कांतीलालजी चोरडिया यांनी ४९ वर्षापूर्वी कठोर परिश्रम करून सुरू केले. आज जैन जागृतिचे ५० व्या वर्षात प्रदार्पण होत आहे. त्याबद्दल जैन जागृतिचे संपादक माननीय श्री. संजयजी चोरडिया, संपादिका सौ सुनंदाजी चोरडिया व जैन जागृतिची सर्व टीम यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन.

खरंतर जैन जागृति मासिकाचे कौतुक करणे म्हणजे समुद्रात पाणी टाकून त्याचा आकार वाढविण्यासारखे आहे.

जैन जागृति मासिका मुळे माझी लेखिका म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली मासिकांमध्ये लेख आल्यानंतर लेख खूप छान लिहिला आहे, अभिनंदन तुमचे, असे जेव्हा फोन येतात तेव्हा खूप आनंद होतो.

मला लेखनाची संधी जैन जागृति ने दिली त्याबद्दल माननीय संजयजी यांना खूप खूप धन्यवाद,

जैन जागृतिच्या पन्नासाव्या वर्षातील पदार्पणा निमित्त माझ्या  भावना काव्यरूपी शब्दात व्यक्त करीत आहे.

*जैन समाजातल्या प्रत्येक मनाचा आरसा हा,*
*सदैव समाज जागृतीच्या विचारांचा जलसा हा,*
*धार्मिक सामाजिक आणि संस्कार*
*पूर्ण लेखांना वाव देणारा प्रत्येक उपक्रम ,*
*त्यातून समाज विकासाची सदैव आठवण.*
*अनेक जैन महिलांना लाटण्या बरोबरच लेखणी*
*चालवायला शिकविणारी जिवाभावाची सखी,*
*अन् सर्वच वाचकांना नवनवीन विचारांसोबत*
*संस्काराची शिकवण देणारा हा गुरू.*

नेहमी नवनवीन विषयांची शिदोरी, समाजातल्या घटनांचं प्रतिबिंब आणि कौतुकाचे शब्द यांची सांगड घालून लोकप्रिय असलेलं संपूर्ण कुटुंबाच्या जागृतीचं हे व्यासपीठ

'जैन समाजात प्रचंड खपाचं व लोकप्रिय मासिक हे ब्रीद वाक्य शब्दशः खरं करणारं स्व. कांतीलालजी चोरडिया यांनी लावलेलं हे रोपटं, याचाच आज सुवर्ण महोत्सवी वर्षात  गोड फळांनी बहरलेला वटवृक्ष झालाय.

जैन जागृतिच्या पुढील वाटचालीस हृदयापासून हार्दिक हार्दिक शुभेच्छा.



सौ. राजश्री अनिलजी
बिनायकिया.
चिंचवड़ पुणे ३३
मो. ८८८८९२५८०३

## उपयुक्त अंक, आकर्षक कव्हर

जैन जागृतिचा ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८ चा दिपावली अंक मिळाला. मुखपृष्ठावरील भगवान महावीर स्वामी व श्री गौतमस्वामीचे चित्र फार सुंदर आहे. उपयुक्त अंक दिल्याबद्दल धन्यवाद !

प्रेषक : चंद्रभान कोठारी, नारायणगाव

## सर्वांगाने उत्कृष्ट – जैन जागृति

क्षमापर्वचा जैन जागृतिचा अतिशय उपयुक्त, आकर्षक अंक मिळाला. वेळेवर पाठविल्याबद्दल धन्यवाद ! अंक नेहमीच वेळेवर येतो.

जैन जागृतिने ५० व्या वर्षात पदार्पण केल्याने स्वाभिमान वाटला. आपल्या समाजाची सार्थ वाटचाल पाहून आनंदाने मन हर्षित झाले. सर्वांगाने उत्कृष्ट असलेले 'जैन जागृति' श्री. संजयजी, धर्म जागृति, समाजसेवा निष्ठेने यथायोग्य करीत आहेत, हे प्रत्येक जैन जाणत आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच.

जैन जागृति सुरु करण्याचे वेळेस १९६९ साली, इगतपुरीला येऊन स्व. कांतीलालजींनी मला सभासद करुन घेतले. वेळोवेळी त्यांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. त्यांचा ऋणी आहे मी. या पुढेही प्रत्येकजण 'जैन जागृति'चा सभासद झाल्याशिवाय राहणार नाही, याची खात्री आहे मला.

प्रेषक : राणुलाल माणिकचंदजी कोचर
नाशिक. मो. ९४२२२४९८९३

## कडवे प्रवचन

**मुनिश्री तरूणसागरजी**

पानी पर खींची गई लकीर की कोई उम्र नहीं होती जीवन भी लगभग ऐसा ही है ।

पता नहीं कब कुछ करने का नगाड़ा बज जाए । अत: सौ काम छोड़कर सत्संग में बैठना चाहिए और हजार काम छोड़कर धर्म-ध्यान करना चाहिए । अगर 'आज' ऐसा नहीं किया तो 'कल' बहुत बुरा होगा ।

सोमवार को जन्म हुआ, मंगलवार को बड़े हुए, बुधवार को विवाह हुआ, गुरूवार को बच्चे हुए,

शुक्रवार को बीमार पड़ गये, शनिवार को अस्पताल गए और रविवार को चल बसे ।

मैं पूछता हूँ – क्या यही जिंदगी है ? •

### मृत्यु को महोत्सव बनाएँ

## मौत का अलार्म

**लेखक : साध्वी – युगल निधी–कृपा**

प्रख्यात विचारक टालस्टॉय ने एक जगह लिखा है, ' आज का आदमी जब खाने के लिए बैठता है तो ऐसे खाता है जैसे दूसरे दिन खायेगा ही नहीं... जब मकान बनाता है तो ऐसा बनाता है मानो उसे मकान से कभी विदा होना ही नहीं ... ।'

जीवन की इस असलियत को हर पल समझकर जीना कि मौत का अलार्म अगले पल भी बज सकता है.... क्योंकि लम्बे समय की गारंटी मनुष्य को बेफिक्र बना देती है । इसी कारण संसार में इतनी अधिक अराजकता और धोखेबाजी है । मौत निश्चित है पर उसका समय नियत नहीं है ...।

स्मरण रख .... कर्जा और मौत की यात्रा दिन रात चलती है । कर्जे को भूल जाने से जैसे कर्जा नहीं टलता उसी तरह मौत की बात चाहे जितनी टालना चाहो या उसे भूलाने की कोशिश करो वह कभी नहीं टलती ।

मौत की याद अगर उत्कट रीति से जाग्रत रहे तो मनुष्य बहुत सी गलतियों से ... पाप-दोषों से.... बुराईयों से और गुनाहों से स्वयं को बचा सकेगा ... जीवन में अध्यात्म की गहराई आयेगी ... फिजूल बातों में वह अपने दिन बरबाद नहीं करेगा और जीवन को कृतार्थ बनाने में उसे सफलता मिलेगी... ।

विदेश में रहने वाले मुसाफिर को जैसे स्वदेश लौटने की स्मृति दिन-रात बनी रहती है ऐसे ही जीवन में मौत का यह अलार्म सतत बजना जरूरी है –

''ए मुसाफिर ! क्यूँ पसरता है यहाँ ?
ये किराये पर मिला तुझको मकाँ ... ।
कोठडी खाली करा ली जाएगी ...
जब तेरी डोली निकाली जाएगी ... ।।'' •

## कव्हर तपशील - डिसेंबर २०१८

- **पावापुरी जल मंदिर – निर्वाण महोत्सव**
  आगम तीर्थ, पावापुरी जल मंदिर, कात्रज, पुणे येथे गत बारा वर्षापासून भगवान महावीर निर्वाण कल्याणक महोत्सव भव्य कार्यक्रमात साजरा केला जातो. पावापुरी जल मंदिर व परिसर सुंदर सजावट व उत्कृष्ट रोषणाई व हजारो दिव्याने सजविण्यात आला होता. जलतरंग व संगीत कार्यक्रम ठेवण्यात आला. ७ नोव्हेंबर दीपावली दिवशी सुमारे पंधरा हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

- **पुणे मनपा आचार्य आनंदऋषिजी भवन भूमीपूजन**
  शत्रुंजय गंगाधाम रोड, कोंढवा बु., पुणे येथे पुणे महानगरपालिका स्थानिक नगरसेवक विकास निधीतून राष्ट्रसंत आचार्य सम्राट प.पू. श्री आनंदऋषिजी म.सा. बहुउद्देशीय भवन निर्माण केले जाणार आहे.

  कात्रज कोंढवा सकल जैन महासंघ पुणे तर्फे भूमीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. आमदार श्री. योगेशजी टिळेकर, स्थायी समिती सदस्य नगरसेविका सौ. रंजनाताई टिळेकर, नगरसेविका सौ. वृषालीताई कामठे, नगरसेवक श्री. विरसेनजी जगताप, नगरसेवक श्री. प्रविणजी चोरबेले, श्री. अभय छाजेड, श्री. माणिकशेठ दुगड, श्री. प्रमोदजी दुगड, श्री. गणेश चोरडिया, श्री. नितीन चोरडिया इत्यादि मान्यवरांचे हस्ते भूमीपूजन संपन्न झाले. या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रवर्तक श्री. कुंदनऋषिजी म.सा. श्री. अलोकऋषिजी म.सा. आदि संतसती व जैन समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

- **'जैन जागृति' दीपावली अंक प्रकाशन, पुणे**
  जैन जागृति दीपावली अंकाचे प्रकाशन राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग सदस्य श्री. सुनिलजी सिंघी, नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले, श्री. अचलजी जैन, जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी चोरडिया यांच्या हस्ते आचार्य श्री. युगभूषण सूरीश्वरजी – पंडित म.सा., मुनिश्री आलोकऋषीजी म.सा. आदि संत सति यांचा सान्निध्यात ओसवाल बंधू कार्यालयात २८ ऑक्टोबर रोजी करण्यात आला.

- **महर्षी आनंद पुरस्कार – मरकळ**
  महर्षी आनंद सेवा प्रतिष्ठानाच्या वतीने महर्षी आनंद पुरस्कार समारंभ मरकळ येथे प.पु. श्री. प्रशांतऋषिजी म.सा. यांच्या ३९ व्या दीक्षा दिनानिमित्त संपन्न झाला. सदर पुरस्कार वितरण ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष मोहनलालजी चोपडा, राष्ट्रीय युवा संरक्षक पारसजी मोदी व प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया यांच्या हस्ते करण्यात आले. जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा सौ. रुचिरा सुराणा यांना ''महर्षि आनंद महिला भूषण'' जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय युवाध्यक्ष श्री. शशिकुमार कर्नावट यांना ''महर्षि आनंद युवा भुषण'', श्री. लालचंदजी नहार यांना ''महर्षि आनंद धर्मभुषण'' आणि डॉ. हर्षद गेलडा यांना ''महर्षि आनंद शिक्षण भुषण'' पुरस्कार देण्यात आला.

- **ज्योतिष गुरु विनोदजी जैन – पुणे**
  पुणे येथील ज्योतिष गुरु श्री. विनोदजी जैन यांचा ज्योतिष रत्न सन्मानाने मुनिश्री पुलकसागरजी म.सा. यांनी विशेष सन्मान केला. एच. एन. डी. बोर्डींग येथे मुनि पुलकसागरजी बिदाई समारोहात त्यांना सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

- **P.H. Diagnostic Dubai पुरस्कार**
  दुबई येथील P.H. Diagnostic LLC यांना दुबई येथील स्मार्ट हेल्थ तर्फे टॉप ५० हेल्थ केयर

कॅमपॅनीस अवार्ड देण्यात आला. दुबई येथे १४ नोव्हेंबर रोजी डॉ. हेमंत धोका यांनी पुरस्कार स्वीकारला.

- **नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले समाज भूषण**
  जय आनंद ग्रुपच्या वतीने दिला जाणारा 'समाज भूषण पुरस्कार' पुणे महापालिकेचे नगरसेवक व पूना मर्चंट चेंबरचे माजी अध्यक्ष प्रवीण चोरबेले यांना मंत्री व आमदार श्री. गिरीषजी बापट यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे सभागृहात प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार माधुरी मिसाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त (क्राईम) भानुप्रताप बर्गे, महावीर प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विजयकांत कोठारी, राष्ट्रीय युवा जैन कॉन्फरन्सचे संरक्षक पारस मोदी, जय आनंद ग्रुपचे अध्यक्ष शांतीलाल नवलाखा, जीतोचे अध्यक्ष विजय भंडारी, मनीषा चोरबेले आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

- **मा. नगरसेविका सौ. मनीषा चोरबेले – सन्मान**
  पुणे येथील मा. नगरसेविका सौ. मनीषा चोरबेले यांना श्री भवानी प्रतिष्ठान व परिवर्तन ट्रस्ट तर्फे स्त्री शक्ती सन्मान जागर पुरस्कार देण्यात आला. सिक्कीमचे मा. राज्यपाल श्रीनिवास पाटील, पंडित वसंतराव गाडगीळ, डॉ. शैलेश गुजर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

- **लोटस इव्हेंटस, श्री. संदिप भटेवरा – सन्मान**
  लायन्स क्लब ऑफ पुणे, गणेशखिंड ट्रस्टच्या वतीने 'एक शाम कुमार विश्वास के नाम' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गणेश कला क्रीडा मंदिर येथे केले होते. या कवी संमेलनाचे सर्व आयोजन ''लोटस इव्हेन्ट व प्रॉडक्टस्'' चे संदिप भटेवरा व श्री. आदि भटेवरा यांनी केले. गणेशक्रिडा रंगमंच नाविन्यपूर्ण सजवले होते. यशस्वी आयोजनाबद्दल लोटस इव्हेन्टचे प्रमुख श्री. संदिपजी भटेवरा यांचा सन्मान प्रख्यात कवी व राजकीय नेते डॉ. कुमार विश्वास, लायन्स क्लब ऑफ गणेशखिंड ट्रस्टचे अध्यक्ष श्री. विजयजी भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले.

- **निलकंठ ज्वेलर्स पुणे – सन्मान**
  लायन्स क्लब ऑफ पुणे, गणेशखिंड ट्रस्टच्या वतीने 'एक शाम कुमार विश्वास के नाम' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गणेश कला क्रिडा मंदिर येथे केले होते.
  या कविसंमेलनाचे मुख्य प्रायोजक निलकंठ ज्वेलर्स हे होते. निलकंठ ज्वेलर्सचे श्री. दिलबाग सिंग व श्री. साहेब दयाल सिंग यांचा सन्मान प्रख्यात कवी व राजकिय नेते डॉ. कुमार विश्वास, लायन्स क्लब ऑफ गणेशखिंड ट्रस्टचे अध्यक्ष श्री. विजयजी भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले.

- **चि. कौशल टाटीया, पुणे – सन्मान**
  पुणे येथील श्री. प्रशांतजी शोभाचंदजी टाटीया यांचा पुतण्या व स्व. सुरेशजी टाटीया यांचे सुपुत्र चि. कौशल याने नुकतीच B Arch Degree घेतली. त्याचा Global Architectural and Design Award स्पर्धेत जागतीक पातळीवर द्वितीय क्रमांक आला. तसेच Indian Green Building Design Council स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला व तो National Award Winner ठरला. भव्य कार्यक्रमात त्याचा सन्मान करण्यात आला.

- **C.A चिराग कटारिया – पुणे**
  पुणे येथील श्री. अजयजी माणिकचंदजी कटारिया (चॉइस बुक स्टॉल) यांचे सुपुत्र C.A चि. चिराग यांचे चिराग कटारिया ॲण्ड असोसिएटस् या नूतन ऑफीसचे उद्घाटन १८ ऑक्टोबर रोजी झाले. यावेळी आमदार व मंत्री श्री. गिरीषजी बापट, यांचा सोबत श्री. अजयजी, श्री. अतुलजी, चि. चिराग व कटारिया परिवार.